भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ०३.०८.२०१९ ते ०७.०८.२०१९)

| अंक ६२/२०१९ | दिनांक ०२.०८.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२७/०७/२०१९ ते ०२/०८/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०३/०८/२०१९ ते ०७/०८/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७/०७ | २८/०७ | २९/०७ | ३०/०७ | ३१/०७ | ०१/०८ | ०२/०८ | दिनांक | | ०३/०८ | ०४/०८ | ०५/०८ | ०६/०८ | ०७/०८ |
| २६.४ | २६.५ | ५९.७ | ७०.२ | ३२.४ | २७.४ | ४०.८ | पाऊस (मि. मी) | | ७७ | ५४ | ५७ | १०२ | ७७ |
| २८.० | २९.० | २८.० | २८.० | ३१.० | ३१.० | ३०.५ | कमाल तापमान (अं. से) | | ३१ | ३१ | ३० | ३० | ३१ |
| २३.० | २४.० | २३.० | २३.० | २३.० | २४.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | | २३ | २३ | २३ | २३ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ८ | ८ | ८ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ९३ | ९३ | ९६ | ९५ | ९३ | ९३ | ८६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९१ | ९१ | ९२ | ९२ | ९२ |
| ९२ | ८५ | ९२ | ८५ | ८५ | ८५ | ९२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८२ | ८४ | ८७ | ८७ | ८५ |
| ०.३ | १.० | ०.५ | १.५ | १.० | ४.२ | ५.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ०२० | ०२२ | ०२० | ०२१ | ०२० |
| स्थिर | स्थिर | स्थिर | पश्चिमे | स्थिर | दक्षिणे | दक्षिणे | सकाळ | वा-याची दिशा | पश्चिमे कडून | नैऋत्ये कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून | नैऋत्ये कडून |
| स्थिर | दक्षिणे | स्थिर | स्थिर | दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | २३१८.० | २३१८.० | २८३.४ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात वा-याचा वेग वाढुन अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | फुटवे | लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत शेतातील पाण्याची पातळी २.५ ते ५ से. मी पर्यंत ठेवावी.<br>काही ठिकाणी भाताच्या पुर्नलागवडीनंतर एक महिना झालेले पीक कमाल फुटवे येण्याच्या अवस्थेत असल्याने नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति गुंठा ८७० ग्रम युरियाच्या स्वरुपात द्यावा.<br>तत्पुर्वी भात खाचरातील तणांची बेणणी करावी व शेतातील पाणी काढुन टाकावे. खत दिल्यानंतर पाणी बांधुन घ्यावे. तसेच भात पीकाचे किड, रोग इ. साठी सतत निरक्षण करावे.<br>शेताच्या बांधावरील वाढलेल्या तणांच्या नियंत्रणासाठी पावसाची ऊघडीप पाहून ग्रामोक्झोन हे तणनाशक ३ मिलि प्रती लिटर पाण्यात मिसळुन बांधावर फवारावे.<br>भात खाचरात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. |
| नागली | फुटवे | नागली पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास आवश्यकतेनुसार ट्रायसायक्लॅझोल १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलेन १० मिलि प्रती १० लि. पाण्यातुन फवारावे.<br>नागली पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणासाठी कार्बेडॅन्झिम या बुरशीनाशकाची १ ग्रम प्रती लिटर पाणी या प्रमाणात ड्रेचिंग करावे. |
| भुईमुग | रोप | भुइमुगाच्या लागवडीमध्ये पाण्याचा योग्य निचरा करावा व पिकाची बेणणी करुन घ्यावी. |
| आंबा | - | आंबा पिकात खताची मात्रा देउन झालेली असल्यास नियमित फळधारणेसाठी कलमांना १५ जुलै ते ३१ ऑगस्ट या दरम्यान १० वर्षावरील कलमांना पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे. पॅक्लोब्युट्राझॉल हे झाडाच्या आकारमानानुसार व पसारा मोजुन द्यावयाचे असल्याने झाडाचा पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर पसा-याचा व्याज मोजावा. उदा- पुर्व- पश्चिम व्यास ५ मिटर व दक्षिण-उत्तर व्यास ३ मिटर म्हणजे सरासरी व्यास ४ मिटर होईल. २३% पॅक्लोब्युट्राझॉल घटक असलेल्या रसायनातुन द्यावयाचे असल्याने प्रती मिटर व्यासास ३ मिलि प्रमाणे १२ मिलि कल्टार द्यावे. प्रत्येक झाडाला पॅक्लोब्युट्राझॉलची मात्रा घेउन ३ ते ६ लिटर पाण्यात मिश्रण तयार करावे व खताच्या रिंगेच्या आतल्या बाजुस १५ सेमी खोलीचे २५ ते ३० खड्डे खणावे प्रत्येक खड्ड्यात १०० मिली याप्रमाणात पॅक्लोब्युट्राझॉल ओतावे आणि खड्डे बुजवुन घ्यावेत. पॅक्लोब्युट्राझॉल देण्यापुर्वी व नंतर झाडाभोवती असलेले गवत काढुन घ्यावे. तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी व पाऊसाची उघडीप बघुन पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे.<br>काही ठिकाणी पाऊसाने ऊघडीप दिल्यास व आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने खाणारी अळी आणि मिजमाशीपासुन आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट १२ मिली किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन पावसाची ऊघडीप पाहून फवारणी करावी. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ १ मिलि/१लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| भाजीपाला | फुलोरा | वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये भुरी किंवा केवडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोगग्रस्त पाने काढुन नष्ट करावीत. डायथेन एम. ४५ किंवा डायथेन झेड. ७८ यापैकी एका बुरशीनाशकाची २५ ग्रम/१० लि. पाणी याप्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. डॉ. बा.सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे भेंडी, मिरची, वांगी इ. भाज्यांना खताचा दुसरा हप्ता द्यावा. भेंडीसाठी प्रती गुंठा क्षेत्रास ७२० ग्रम युरीया, वांगीसाठी १०८० ग्रम युरीया व मिरचीसाठी ८१० ग्रम युरीया या प्रमाणात खताचा दुसता हप्ता द्यावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. बळवंत ना. सावंत<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|